# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः02.09.2024** **वारःसोमवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून तीन दिवसांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर
2. प्रलंबित खटल्यांच्या समस्येवर एकत्रित येऊन उपाय शोधण्याची गरज राष्ट्रपतींकडून व्यक्त
3. मालवणमधील पुतळा दुर्घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीचं मुंबईत आंदोलन; मविआच्या निषेधार्थ भाजपाचंही आंदोलन आणि
4. राज्याच्या अनेक भागात मुसळधार पावसामुळं जनजीवन विस्कळीत, शेतपिकांचंही नुकसान, आज आणि उद्या अतिवृष्टिचा इशारा

**राष्ट्रपती दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून तीन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात वारणानगर इथं श्री वारणा महिला सहकारी समूहाच्या सुवर्णमहोत्सवी सोहोळ्यात त्या आज उपस्थित राहतील. उद्या, मंगळवारी त्या पुण्यातील सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या 21 व्या दीक्षांत समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. तसंच मुंबईत विधान परिषदेच्या शताब्दी वर्षाच्या कार्यक्रमातही सहभागी होणार आहेत. बुधवारी 4 तारखेला राष्ट्रपतींच्या हस्ते लातूर जिल्ह्यातील उदगीर इथल्या बुद्ध विहाराचं उद्घाटन होणार आहे. उदगीर इथं राज्य शासनाच्या 'शासन आपल्या दारी' आणि मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांच्या मेळाव्यालाही त्या मार्गदर्शन करणार आहेत.

**राष्ट्रपती**

प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करणं हे न्यायपालिकेपुढचं मोठं आव्हान आहे. प्रलंबित खटल्यांच्या या समस्येवर उपाय शोधण्यासाठी सर्व संबंधितांनी एकत्र येण्याची गरज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित जिल्हास्तरीय न्यायपालिकेच्या दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेच्या समारोप सत्रात त्या बोलत होत्या. सर्वोच्च न्यायालयानं भारतीय न्यायशास्त्राचं स्थान उंचावल्याचं सांगून यात योगदान देणाऱ्या सर्वांचा गौरवपूर्ण उल्लेख राष्ट्रपतींनी केला. सर्वोच्च न्यायालयाचं नवं बोधचिन्ह आणि ध्वजाचं अनावरण करून आनंद झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्याबाबत विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीनं एक कृती आराखडा तयार केला आहे, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी आपल्या भाषणात सांगितलं.

**फडणवीस.**

विधी आणि न्याय क्षेत्रात महिलांचा वाढता सहभाग ही सकारात्मक बाब असून भारतीय न्याय व्यवस्था अधिक सुदृढ आणि बळकट असल्याचं ते द्योतक आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं केलं. महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या मुलींच्या वसतिगृहाचं उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्रातील तीनही विधी विद्यापीठं आपल्या कार्यकाळात स्थापन तसंच कार्यान्वित झाल्याबद्दल फडणवीस यांनी समाधान व्यक्त केलं. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मंगेश पाटील, न्यायमूर्ती रविंद्र घुगे, राज्याचे महाअधिवक्ता डॉक्टर बिरेंद्र सराफ यांच्यासह विधी आणि न्याय क्षेत्रातील विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**मविआ आंदोलन**

मालवणमधील पुतळा दुर्घटनेच्या निषेधार्थ काल मुंबईत महाविकास आघाडीच्या वतीनं गेट वे ऑफ इंडिया परिसरात राज्य सरकारच्या विरोधात जोडे मारो आंदोलन करण्यात आलं. राज्याच्या कानाकोपऱ्यात पुतळे उभे आहेत. परंतु मालवणच्या घटनेत भ्रष्टाचार झाल्यामुळं तो कोसळला असा आरोप ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केला. यावेळी छत्रपती शाहू महाराज, उद्धव ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचीही भाषणं झाली. दरम्यान, महाविकास आघाडीच्या आंदोलनाला प्रत्युत्तर म्हणून भाजपानंही काल राज्यात ठिकठिकाणी आंदोलन केलं. विरोधकांना पराभव दिसत असल्यामुळे त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना केली. तर महाविकास आघाडीचं आंदोलन पूर्णपणे राजकीय असल्याची टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलताना केली.

**पोषण सप्ताह-गडचिरोली**

समतोल आणि पोषक आहाराबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशानं राबवल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पोषण सप्ताहाला कालपासून देशभरात सुरुवात झाली. या अंतर्गत पोषण आहाराचं महत्त्व विषद करणारी चर्चासत्रं, कार्यशाळा, शैक्षणिक उपक्रम, असे विविध जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. दरम्यान केंद्र शासनानं देशातील 10 जिल्ह्यांमध्ये पोषणविषयक नवोन्मेष आणि कौशल्य विकास केंद्र सुरू केली आहेत. यात महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. या केंद्राचं उद्घाटन राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते काल गडचिरोली इथं करण्यात आलं. या केंद्राच्या माध्यमातून गर्भवती महिला, स्तनदा माता आणि किशोरवयीन बालकांचं आरोग्य आणि पोषण या क्षेत्रात गडचिरोली जिल्हा राज्यात दिशादर्शक ठरेल, असा विश्वास आदिती तटकरे यांनी यावेळी व्यक्त केला.

**पोळा-अकोला**

शेतात बळिराजाच्या सोबतीनं राबणाऱ्या, जीवाभावाच्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आज बैलपोळा राज्यभरात साजरा केला जात आहे. बैलांची विशेष सजावट करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पारंपरिक साहित्याला कालौघात आधुनिकतेची जोड दिली जात आहे. त्याविषयीचा हा वृत्तांत...

**पोळ्याकरिता बैलांना सजवण्यासाठी अकोल्याच्या बाजारात आकर्षक म्होरके, घुंगरू, कसंड्या, झुली, गेठे, नाथ, आणि रंग विक्रीसाठी आले आहेत. या परंपरागत साहित्याला यावर्षी नाविन्यपूर्ण जोड देण्यात आली आहे. त्यामुळं हे साहित्य अधिक मनमोहक असल्यानं शेतकऱ्यांच्या पसंतीस पडत आहे. पोळा सणाकरिता बैलांसाठी म्होरक्यांची प्रामुख्यानं खरेदी केली जाते. हे म्होरके आता लोकर, नायलॉन, वेलवेट आणि कृत्रिम फुलांच्या मदतीनं तयार केले आहेत. बैलांच्या शिंगाला लावण्यासाठी गेरू आणि वरणीसचा वापर केला जातो. पाठीवर पांघरल्या जाणाऱ्या झुलीवर विविध कलाकृती चितारल्या आहेत. बैलांच्या गळ्यातील पितळीचे घुंगरू आता स्वस्त नाहीत, त्यामुळं प्लास्टिकपासून बनलेल्या घुंगरांच्या माळा दिसत आहेत, त्यांना कवड्यांच्या मदतीनं आकर्षक बनविलं आहे. कालौघात सजावट बदलत आहे, बैलांचं महत्व मात्र कालातीतच राहील. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, अकोल्याहून मधु कसबे यांच्यासह संध्या खान, पुणे.**

**स्वच्छता अभियान-नवीमुंबई**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत काल नवी मुंबईच्या बेलापूर, नेरूळ  आणि वाशी विभागात विशेष सखोल स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत नियमित स्वच्छतेप्रमाणेच दुर्लक्षित आणि पडीक जागांचीही स्वच्छता करण्यावर भर दिला जातो.

**मद्यजप्त**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुणे विभागीय भरारी पथकानं मुळशी तालुक्यात केलेल्या कारवाईत परदेशी मद्यासह एकंदर 76 लाख रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी उत्तर प्रदेशच्या वाहन चालकाला अटक करण्यात आली आहे.

**<u>अस्मिता खेलो इंडिया-नाशिक</u>**

केंद्र सरकारच्या अस्मिता खेलो इंडिया उपक्रमामुळे मुली आणि महिलांचा क्रीडा स्पर्धांमधला सहभाग लक्षणीयरीत्या वाढत आहे, असं केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी सांगितलं. भारतीय क्रिडा प्राधिकरण, खेलो इंडिया तसंच ज्युदो असोसिएशनच्या वतीनं 'अस्मिता खेलो इंडिया' या उपक्रमाअंतर्गत पश्चिम विभागाच्या वुमन्स लीग ज्युदो स्पर्धेच्या उद्घाटनावेळी त्या बोलत होत्या.

**<u>पाऊस</u>**

राज्यात विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्याच्या अनेक भागांमध्ये मुसळधार पावसानं पुन्हा हजेरी लावली. या पावसामुळे अनेक नदी-नाले ओढ्यांना पूर आल्यानं काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं तसंच शेतातील पिकांचंही नुकसान झालं आहे.

यवतमाळ जिल्ह्यात शेकडो हेक्टर शेतात पावसाचं पाणी शिरलं आहे. वाशिम जिल्ह्यांत पावसामुळं खंडाळा घाटात दरड कोसळल्यानं वाशिम - पुसद मार्ग सकाळपासून बंद होता.

हिंगोली आणि बीड जिल्ह्यातही संततधार पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. लातूर जिल्ह्यात मुसळधार पावसाचा अंदाज असल्यानं सतर्क राहण्याचं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

नांदेड जिल्ह्यात सलग तिसऱ्या दिवशी मुसळधार पाऊस सुरू आहे. जिल्ह्यात बचावकार्यासाठी स्थानिक पथकांसह एसडीआरएफच्या दोन तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. नागरिकांनी आवश्यक असेल तरच घराबाहेर पडावं असं आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

जळगाव जिल्ह्यात दमदार पाऊस झाल्यानं हतनूर धरणाचे आठ दरवाजे पूर्ण क्षमतेने उघडून त्यातून 39 हजार 729 क्यूमेक्स इतका विसर्ग नदीपात्रात करण्यात येत आहे. नदीपात्राजवळ असलेल्या गावकऱ्यांना सतर्कतेचा इशारा प्रशासनानं दिला आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा तसंच विदर्भात आज आणि उद्या जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.